कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
24 Aug 2025 - Page 1

# खवळनाथ देणार ८.५० टक्के अल्प व्याजदराने सोनेतारण कर्ज

## श्री.एम.एल.चौगुले यांची माहिती : खास शेतकरी व महिलांसाठी कर्जपुरवठा

गडहिंग्लज : सोनेतारण ही तात्काळ आर्थिक गरज भागविणारी सुविधा आहे. त्यामुळे येथील श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी (मल्टी-स्टेट) या संस्थेने ८.५० टक्के इतक्या अल्प व्याजदराने खास शेतकरी व महिलांसाठी सोनेतारण कर्ज योजना सुरु केली आहे. अशी माहिती 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



एम. एल. चौगुले म्हणाले, समाजातील गरजू लोकांना तात्काळ अर्थ सहाय्य व्हावे या उद्देशाने ही कर्ज सुविधा सुरु करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत प्रति १० ग्रॅम सोनेवर बाजार मुल्यांकनाच्या ७५ टक्के प्रमाणे कर्ज उपलब्ध करुन दिले जात आहे. रु. २५ लाखापर्यंत हा कर्ज पुरवठा केला जातो. या कर्जसुविधेमुळे सर्वसामान्य गरजू महिला व शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी सुलभ पर्याय उपलब्ध झाला आहे.

गेल्या आर्थिक सालात संस्थेने ५०० कोटी ठेवींचा टप्पा पार केला आहे. वर्षभरामध्ये १५ कोटीहून अधिक ठेवीमध्ये वाढ झाली असून संस्थेकडे ५२८ कोटी ठेवी आहेत.

वाढीव ठेवींचा उपयोग समाजातील महिला व शेतकरी वर्गासाठी व्हावा या उद्देशाने संचालक मंडळाने अल्प व्याजदराने सोनेतारण कर्ज देण्याचा निर्णय घेतला. संस्थेकडून कमीतकमी कागदपत्रे आणि तात्काळ कर्ज वितरणाची सेवा दिली जाते. संस्थेने स्थापनेपासूनच पारदर्शक व्यवहार, सुरक्षितता आणि विश्वासार्हता जपली आहे. त्यामुळे या योजनेचा अधिकाधिक शेतकरी व महिला ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संचालक मंडळातर्फे करण्यात आले आहे.